
# प्लेटलेटचा अभाव आणि होमिओपॅथीचा प्रभाव




Idiopathic Thrombocytopenic Purpura (आय.टी.पी.) म्हणजे अस्थिमगजातील व्याधीशिवाय रक्तातील फक्त प्लेटलेटचे प्रमाण कमी असणे. यामुळे लालसर, निळे डाग त्वचेवर उमटतात आणि अचानक रक्तस्त्राव होण्याची संभावना वाढत जाते. या आजाराची दोन प्रकारची अवस्था असू शकते. एक म्हणजे अल्पकालीन अवस्था जी लहान मुलांमध्ये संसर्गानंतर, व्हायरल फिव्हरनंतर दिसून येते आणि जी दोन ते तीन महिन्यांत बरी होते. जुनाट आजार जो प्रौढांमध्ये सहा महिन्यांच्या कालावधीपेक्षा दीर्घकाळ, पुन्हा पुन्हा उद्‌भवणारा गंभीर स्वरूपाचा असतो. हा आजार महिलांमध्ये आणि लहान मुलांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो.

Idiopathic म्हणजे ज्याचे कारण माहीत नाहीये. Purpura म्हणजे त्वचेवर लालसर निळे बिंदू केशवाहिन्यांतील रक्तस्त्रावामुळे उमटणे. Thrombocytopenic म्हणजे प्लेटलेटचे प्रमाण दीडलाखांपेक्षा कमीच राहणे. निरोगी माणसाच्या शरीरात प्लेटलेट्‌सचे प्रमाण दीड लाख ते साडेचार लाख असते. प्लेटलेट्‌सचे प्रमाण दीड लाखापेक्षा कमी होणे म्हणजे Thrombocytopenia.

या प्लेटलेट्‌स हाडातील अस्थिमगजातील (Bone Marrow) Megakaryo Cytes पासून तयार केल्या जातात. रक्तात मिसळल्यानंतर जखमेच्या ठिकाणी या पेशी एकत्रित होतात आणि पोकळी भरून काढतात. त्यानंतर या पेशी त्यांचा आकार बदलतात आणि ग्रहणशील द्रव्य स्त्रवतात. ज्यामुळे इतर प्लेटलेट्‌स आकृष्ट होऊन एकमेकांना चिकटतात आणि गठ्ठा तयार करतात. ज्याद्वारे रक्त साकळण्याची प्रक्रिया सुरू होते आणि प्लेटलेट्‌स, पांढऱ्या पेशींचा, रक्तपेशींचा मिळून गुठळी; desdkauk तयार केला जातो आणि रक्त वाहणे बंद होते. एकदा ही गुठळी तयार झाली की, आणखीन प्लेटलेट्‌स चिकटण्याचे प्रमाण कमी कमी केले जाते आणि जखम भरून काढली जाते. परंतु, आय.टी.पी.मध्ये या पेशी कमी असल्यामुळे रक्त साकळले जात नाही. परिणामी थोड्याशा धक्क्यानेही रक्तस्त्राव होऊ लागतो.



**कारणे :-** स्वायत्तप्रतिकार क्षमतेतील बिघाडामुळे प्लेटलेट्‌सविरुद्ध प्रतिपिंडे तयार करून प्लेटलेट्‌स प्लीहामध्ये नष्ट केल्या जातात किंवा प्लेटलेट्‌स ज्या अस्थिमगजातील पेशींतून (Megakaryo Cytes) तयार होतात त्या नष्ट केल्या जातात. प्लेटलेट्‌स प्लीहामध्ये नष्ट केल्या जात असल्यामुळे प्लीहाचे आकारमान वाढत जाते.

**लक्षणे :-** प्लेटलेट्‌सचे प्रमाण ५०,००० हजार पेक्षा कमी झाल्यावर पुढीलप्रमाणे लक्षणे दिसून येतात - १. त्वचेवर लालसर, निळे छोटे छोटे डाग उठणे. असे डाग शक्यतो हातापायांवर दिसून येतात. २. नाकातून, हिरड्यातून रक्तस्त्राव होणे. मासिक पाळीच्या वेळी जास्त प्रमाणात रक्तस्त्राव होणे. लघवीतून रक्त जाणे. थुंकी, उलटीतून रक्त जाणे. ३. खरचटल्यावर, धक्का लागल्यानंतर लगेच त्वचेवर रक्ताळलेले डाग उमटणे. ४. शरीर कमकुवत व नाजूक बनून शरिरात कुठेही शरिरांतर्गत असणाऱ्या महत्त्वाच्या इंद्रियांमध्ये हा रक्तस्त्राव होण्याची शक्यता वाढते. किडनीत रक्तस्त्राव झाल्यास रक्तासारखी लघवी होते. लहान आतड्यात रक्तस्त्राव झाल्यास काळसर रंगाचे रक्ताचे जुलाब होतात. मेंदूत रक्तस्त्राव झाल्यास मेंदू निकामी होऊन पॅरालिसीस होतो. अशाप्रकारे शरीराच्या अंतर्गत अवयवांवर, बाह्य भागांवरदेखील रक्तस्त्रावाची लक्षणे दिसून येतात.

**निदान :-** १. दैनंदिन रक्ताच्या तपासणीतून (C.B.C) प्लेटलेटचे प्रमाण कळते. २. Bone Marrow Examination या तपासणीत Megakaryocytes पेशी अतिप्रमाणत वाढलेल्या दिसून येतात. ३. सोनोग्राफीद्वारे प्लीहाचे आकारमान कळून येते.

**उपचार :-** पारंपरिक उपचारपद्धती प्लेटलेट्‌स वाढवण्यासाठी स्टिटॉइड्‌सचा वापर केला जातो किंवा प्लेटलेट्‌स घटकाचे रक्तधान केले जाते. परंतु, याचा तात्पुरता फायदा होतो. कारण प्लेटलेट्‌सचे आयुर्मान खूप कमी दिवसांचे असते आणि त्या पुन्हा नष्ट केल्या जातात. शेवटी प्लीहाचे आकारमान वाढत जाते आणि प्लीहा शस्त्रक्रियेद्वारे काढून टाकण्याचा सल्ला दिला जातो.

**केस** - एका १२ वर्षांच्या मुलीच्या शरीरावर अचानक छोटे छोटे डाग दिसून आले. म्हणून तिच्या वडिलांनी रक्ताची तपासणी केली तर त्यामध्ये प्लेटलेटचे प्रमाण खूप कमी झालेले आढळून आले. आणखी काही तपासण्या केल्यानंतर तिला Idiopathic Thrombocytopenic Purpur हा आजार असल्याचे निदान झाले. त्यामुळे तिला ५ वेळ प्लेटलेट्‌स रक्तात चढवण्यात आल्या. घरी गेल्यानंतर पुन्हा तीन महिन्यांतच तशीच लक्षणे आढळून आली म्हणून पुन्हा प्लेटलेट्‌स देण्यात आल्या. डॉक्टरांनी सांगितले की, पुन्हा तिला असा त्रास झाला तर तिच्या जिवाला धोका होऊ शकतो. त्यासाठी तुम्ही तिची प्लीहा शस्त्रक्रियेद्वारे काढून टाका. परंतु, त्यानंतरही तिचे शरीर विविध आजारांना बळी पडू शकते. त्यांना शस्त्रक्रिया करायची नसल्यामुळे ते तिला घेऊन माझ्याकडे आले.

**तक्रारी :-** १. शरीरावर लालसर, निळे चट्टे येणे ७ महिन्यांपासून. २. कूस बदलल्यानंतर, डोळे उघडल्यावर, रात्रीच्या वेळी अचानक चक्कर येणे. डोळे बंद केल्यावर चक्कर थांबणे. ३. गुद्‌द्वारावाटे रक्त पडणे २ दिवसांपासून. ४. सतत अशक्तपणा जाणवणे. ५. तिच्या रिपोर्टमध्ये प्लेटलेटचे प्रमाण ३,००० झाले होते. अत्यंत धोकादायक स्थितीत तिला माझ्या होमिओपॅथिक रुग्णालयात भरती करण्यात आले.

**विशेष माहिती :-** १. नखे खाण्याची सवय २. भूक सहन न होणे. ३. खाण्यात गोडाची, दुग्धजन्य पदार्थांची, फळांची आवड. ४. दुपारच्या वेळी डोळे दुखणे. दाबल्यावर, आराम केल्यावर बरे वाटणे. ५. अधूनमधून घोळणा फुटणे. ६. दिवसातून १० ते १२ वेळा पडसाकडला होणे. पोटात कळ मारून घाणेरडा वास येणारे रक्ती जुलाब होणे. ७. मानेवर व पाठीवर घाम येणे. ८. सतत पाय दुखणे. ९. थंड प्रकृती.

**स्वभाव :-** तिच्या स्वभावाविषयीची माहिती तिच्या आजीने दिली. तिला दोन लहान भाऊ आहेत. आम्ही एकत्र कुटुंबात राहतो. त्याचबरोबर तिला आणखी दोन चुलत भाऊ आहेत. ती आत्ता इयत्ता सातवीत शिकत आहे. ती तिच्या गोष्टी व्यवस्थित, कोणी न सांगता मनानच करते. ती अभ्यासातसुद्धा खूप हुशार आहे आणि तिच्या कामात खूप परफेक्ट आहे. तिच्या मनासारख्या गोष्टी नाही झाल्या आणि लहान भावांना महत्त्व दिले गेले तर ती खूप चिडते आणि आदळआपट करते. आजीने सांगितलेले हे ऐकून ती रुग्ण रडायला लागली. थोड्यावेळाने तिने सांगितले की कुणी मला चिडवलेले, चेष्टा केलेली मला सहन होत नाही. पाचवी इयत्तेत असताना माझी एक वर्गमैत्रीण मला खूप चिडवायची आणि तरीसुद्धा माझ्या जवळच्या मैत्रिणीने तिच्याशी मैत्री केली. त्यानंतर मला एकटं पडल्यासारखं वाटू लागलं. घरीसुद्धा माझे सगळे भाऊ मला सोडून एकत्रित होऊन खेळतात. तेव्हाही मला एकटं एकटं वाटते. मला कोणीच समजून घेत नाही. माझे वडील मला बाहेर खेळायला पाठवत नाहीत.

**तिला कशाची आवड आहे?**

तिला गाणी म्हणण्याची आणि नृत्याची आणि पूजाअर्चना करण्याची आवड आहे.

**तिला भीती कशाची वाटते?**

एकटं राहण्याची, अंधाराची, कुत्र्यांची, भुतांची तिला भीती वाटते.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व :-** १. चोखंदळपणा २. चिडखोरपणा ३. विरोध सहन न होणे. ४. मुद्दाम त्रास दिल्याची भावना. ५. गाण्याची आवड. ६. अंधाराची, भुताची, एकटं राहण्याची भीती. ७. चिडवलेलं सहन न होणे. ८. नखे कुरतडण्याची सवय. ९. खाण्यात थंड पेयांची, गोडाची आवड, दुधाची नावड. १०. रात्रीच्या वेळी चक्कर येणे. ११. अशक्तपणा जाणवणे. १२. थंड प्रकृती.

**प्रतिसाद :-** वरील लक्षणांवर आधारित होमिओपॅथिक औषध मी तिला रुग्णालयात भरती करून सुरू केले. सकाळी तिचे रक्तातील प्लेटलेटचे प्रमाण ३,००० होते आणि संडासावाटे रक्तही पडत होते. त्याच दिवशी संध्याकाळी रक्ततपासणीत तिच्या प्लेटलेट्‌स २२,००० ने वाढल्या. दुसऱ्या दिवशी तिचे संडासावाटे रक्त जाणे थांबले. हळूहळू अशक्तपणा कमी झाला. दररोज तिचे रक्तातील प्लेटलेटचे प्रमाण वाढलेले दिसून आले आणि एका आठवड्यातच तिच्या प्लेटलेट्‌स एक लाखाने ब्लड ट्रान्स्फ्युजनशिवाय वाढल्या आणि त्याचबरोबर तिच्या सर्व तक्रारी थांबल्या.




। विक्रांत आढाव

आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी जितका चांगला आहार घेणे आवश्यक आहे, तितकेच शरीरातील 'टॉक्सिन्स' (विषारी द्रव्ये) बाहेर फेकली जाणेही महत्त्वाचे ठरते. केवळ कर्बोदके, प्रोटिन्स यामुळे शरीराचे संवर्धन होत नसते. याबरोबरच एखादे 'अँटी-ऑक्सिडंट' पदार्थाचे सेवन पण तितकेच आवश्यक आहे. अन्यथा कितीही चांगला आहार घेतला, पण विषारी द्रव्यांचे शरीराबाहेर उत्सर्जन झाले नाही तर ते घातक ठरू शकते.

## अश्वगंधा वनस्पतीचे सेवन शरीरास उपकारक



'अश्वगंधा' वनस्पती भारतीयांनी जगाला दिलेली अद्‌भुत देणगीच म्हणावी लागेल.जगभरात याला इंडियन जिनसिंग म्हणुन संबोधले जाते. अश्वगंधा या वनस्पतीचा शोध भारतीयांनी फार प्राचीन पर्वात लावला होता. सदर वनस्पतिचे नित्यसेवन हे शरीरास अत्यंत उपकारक ठरते. विशेषतः शरीराची दुबर्लता दूर करण्यास याचा चांगला उपयोग होत असतो. अश्वगंधा वनस्पतीचे अन्यत्र फायदे पण अनेक आहेत, अश्वगंधाच्या नित्य सेवनाने मानसिक ताण दूर होण्यास मदत होते. याबरोबरच शरीराची रोगप्रतिकार शक्तीही वाढीस लागण्यास चांगलीच मदत होते. खेळाडुंकरिताही वनस्पती लाभदायी असून यामुळे त्यांची मैदानावरील कामगिरी सुधारण्यास चांगलीच मदत होत असते. सध्याच्या ताण-तणावाच्या व धकाधकीच्या युगात तर या वनस्पतीचा चांगलाच उपयोग होउ शकतो. मात्र याचे सेवन करण्या अगोदर डॉक्टरचा सल्ला घेणे नक्कीच फायद्याचे ठरते.

## 'डेंटल इमर्जन्सी' विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळा

**। पुणे : प्रतिनिधी**

'मॅनेजमेंट ऑफ मेडिकल इमर्जन्सी इन डेंटल सेटअप' या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन 'एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ डेंटल सायन्स अ‍ॅण्ड रीसर्च सेंटर'च्या लहान मुलांच्या दंतचिकित्सा विभागात करण्यात आले होते. डॉ. राहुल हेगडे (डेंटल कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य) यांनी या कार्यशाळेचे उद्‌घाटन केले. इंडियन सोसायटी ऑफ पेडोडोंटिक्स अ‍ॅण्ड प्रिव्हेंटिव्ह डेंटिस्ट्रीच्या सहकार्याने ही कार्यशाळा पार पडली.

# रुग्णालयातील केमिस्टकडून औषधाची सक्ती नकोच


**। पुणे : प्रतिनिधी**

रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांसाठी रुग्णालयातील औषधाच्या दुकानांतून औषधे खरेदी करण्याची सक्ती करू नये अशी मागणी सजग नागरिक मंचाने एफडीएकडे निवेदनाद्वारे केली आहे.

औषधे रुग्णालयातील केमिस्टकडून घेण्यात यावी, अशी सक्ती करणाऱ्या केमिस्टवर एफडीने नुकतीच कारवाई केली होती. त्यावर शहरातील एका नामांकित रुग्णालयाने नरमाईची भूमिका घेत, बाहेरची औषधे आणण्याची मुभा रुग्णांना दिली आहे. अशाचप्रकारची मुभा शहरातील सर्व रुग्णालयांनी द्यावी अशा आशयाचे निवेदन सजग नागरिक मंचाने अन्न व औषध प्रशासन विभागाला दिले आहे.

रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांसाठी तेथीलच केमिस्टकडून औषधे खरेदी करण्याची सक्ती शहरातील बहुतेक रुग्णालयांकडून केली जाते. घाऊक विक्रेत्यांकडे तीच औषधे जवळपास निम्म्या दरात उपलब्ध असतानाही, तीच औषधे रुग्णालयातील केमिस्ट महाग दराने विकत असतात. या सक्तीमुळे रुग्णांना नाहक त्रास तर होतोच शिवाय आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. शिवाय खरेदी केलेली सर्व औषधे रुग्णांसाठी वापरली जातातच असे नाही. इतर औषधांच्या दुकानांतून १० टक्के सवलतीच्या दराने औषधे मिळतात, ती रुग्णाला न लागल्यास पुन्हा घेतलीही जातात. त्यामुळे रुग्णालयाच्या केमिस्टकडून औषधे घेण्यापेक्षा बाहेरच्या दुकानातून औषधे खरेदी करणे सर्वसामान्य नागरिकांना परवडते, त्यामुळे खासगी रुग्णालयांनी औषधे खरेदी करण्याची सक्ती करू नये, अशी मागणी मंचाने केली आहे.

## पुण्य नगरी टाइमपास



### आडवे शब्द

१. राज कपूर यांचा किंवा अजय देवगनचा एकाच नावाचा एक चित्रपट
४. विशाल आनंदचा किंवा शाहरूख खानचा एकाच नावाचा एक चित्रपट
९. धर्मेंद्रचा किंवा अनिल कपूरचा एकाच नावाचा एक चित्रपट
१२. एक चित्रपट- ** लखन
१३. फरक, फेरफार, अंतर (हिंदी)
१५. राजाच्या आगमनाच्यावेळी फुंकून वाजवायचे एक वाद्य
१६. तंबूचे कापड किंवा कापडी भिंत
१७. सतत रंग बदलणारा एक प्राणी
१८. बाण, तीर (संस्कृत)
१९. उणीव, कमीपणा, वाळवी
२१. आठवड्याचा पहिला वार
२४. हल्ला, भडीमार, सततचे मारणे
२५. अंगचे गुण, मुक्ती, कौशल्य
२६. वाचून, शिवाय, खेरीज
२८. मोकळा, सुटलेला
२९. राजेश खन्नाचा किंवा अक्षयकुमारचा एकाच नावाचा एक चित्रपट
३१. धर्मेंद्र व अमिताभ यांचा एक चित्रपट
३३. फळातील पातळ द्रव पदार्थ, रुची
३४. कर्नाटकाची राज्यभाषा
३५. कापड कापण्याचे साधन, कात्री
३६. पाण्याची लहर, ऊर्मी
३७. रव्याचा गोड सांजा
३८. झारखंडमधील एक औद्योगिक शहर
४०. भूमितीतील ९० अंशाचा कोन
४२. वाशिम जिल्ह्याच्या शेजारील एक जिल्हा
४४. द्रोणाचार्यांना गुरुदक्षिणा म्हणून अंगठा कापून देणारा एक शिष्य
४६. नेपाळचा राष्ट्रीय पक्षी
४८. घोडा, वारू, अश्व (संस्कृत)
४९. एक पौष्टिक फळ
५०. घरातील 'खोली' (हिंदी)
५१. तीन ओळींचा एक जपानी काव्य प्रकार
५२. नम्र, नत, लय पावलेला
५३. लहान मुलांचा मोठा आक्रोश
५४. दोन भावांपैकी कमी वयाचा, कनिष्ठ
५७. नाटकात काम करणारा पुरुष
५९. फायदा, लाभ
६१. नवरा, दादला
६२. एक मराठी कवी- बा.भ. ****
६४. कारले (हिंदी)
६७. अर्धा डझन वस्तूंची संख्या
६९. मुख्य चुलीला बोगदा करुन उपचुलीची करतात ती सोय, तलम सुताचा एक प्रकार
७१. चार वेदांपैकी तिसरा
७४. गाडीचे वरचे आच्छादन
७५. अवकाळी पडणारा पाऊस
७६. एक आणि अर्धा मिळून होणारी संख्या
७७. खोटा आरोप, बालंट, अदावत
७८. पांढरा, ढवळा (संस्कृत)
८०. हिस्सा, वाटा, भागाकाराचे फळ
८२. लेप, रजई, सारवण
८४. अवस्था, स्थिती, गत
८५. गडू तांब्या
८७. केरसुणी, झाडू
८८. पायात घालायचा इंग्रजी तऱ्हेचा चढाऊ जोडा (इंग्रजी)
८९. थंडीचा ऋतू, शीतकाल
९०. सत्यानाश, नासाडी, बरबादी (उर्दू)

### उभे शब्द


१. 'एखाद्याच्या कृत्यावर सवाई कृत्य करुन मात करणे', या अर्थाची म्हण
२. कागदाचे २० दस्त्यांचे माप
३. पद्धतशीर, रीतीप्रमाणे
४. रुंद (हिंदी), पायाचा बोटांकडील अर्धा भाग
५. वाईट सवय, खोड, लकब
६. हुशार, कुशल, बुद्धिमान
७. वेल, वल्लरी, मुलींचे एक नाव
८. कुमार गौरव व पूनं धिल्लो यांचा एक चित्रपट
९. मेंढीच्या अंगावरचे मऊ केस
१०. आमीर खान व काजोल यांचा एक चित्रपट
११. अनुरक्त, तल्लीन, रममाण
१४. पुष्कळ, अती, जादा
१८. अमिताभचा एक चित्रपट, मद्यपी
२०. कारण, निमित्त
२२. प्रगती, उन्नती, वाढ, मुलांचे एक नाव
२३. मार्ग,पथ, रस्ता
२४. आदर, सत्कार, प्रतिष्ठा
२५. पाकिस्तानातील एक शहर
२६. भारताचा सध्याचा आघाडीचा एक तडाखेबाज फलंदाज
२७. नाव (हिंदी), गंधाचा टिळा
२९. तीन मूलभूत गरजांपैकी पहिली
३०. वजनदार, भारी, अवघड
३२. कपाळ, भाल
३४. करवलीच्या हातातील मंगल कलश
३५. इजिप्तची राजधानी
३७. शिवण, टाका, शिवणावळ
३८. ऋषी कपूर व जुही चावला यांचा एक चित्रपट
३९. कविता, कवन
४०. क्लार्क, लिपिक
४१. डोळा, चक्षू, लोचन
४२. मानहानी, मानखंडना
४३. देवाचा किंवा ऋषीचा क्रोध, संताप
४४. अजय फणसेकर दिग्दर्शित एक चित्रपट
४५. कमी, कमती (हिंदी)
४६. एक प्रसिद्ध गरम पेय
४७. आंब्यातील बी, बाठा
५३. घोड्याचा तळपाय, लाथ
५५. हात, सरकारी सारा
५६. नाणे पाडण्याचा कारखाना
५८. एकाग्र दृष्टी
६०. बरगडी
६३. एक इंग्रजी दारु
६५. भाव, किंमत, दर (इंग्रजी)
६६. निष्काळजीपणा, बेपर्वा (हिंदी)
६८. अभिनय, नखरा, हातवारे
७०. मोठ्या लिंबाची एक जात
७२. हवामानाचा व पाऊस पाण्याचा अंदाज दर्शविणारे ठिकाण
७३. पहाटे गवतावर जमणारे जलबिंदू
७५. जंगलात पेटलेली आग
७७. शपथ, प्रतिज्ञा
७९. सोबत, लागून, सलग
८१. तमाशातील गणेशस्तवन
८३. बुद्धिबळ मांडण्याचा तक्ता, पडदा
८४. औषध
८६. धातूचा उभा करंडा, पत्र्याचा खोका

### कालचे टाइमपासचे उत्तर



## वाचवाल तर वाचाल

### पाण्याच्या संकटावर सामूहिकपणे मात करू

सद्यस्थितीत शहरात पाणीकपातीचे धोरण सुरु झाले आहे. यंदा पावसाने दगा दिल्याने नागरिकांवर ऐन पावसाळ्यात पाण्याचे संकट ओढवले आहे त्यामुळे नागरिकांनी याचा सामुहिकपणे सामना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पिण्यासाठी लागणाऱ्या पाण्याची बचत होऊ शकत नाही मात्र घरामध्ये इतर कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची मात्र मोठी बचत होऊ शकते. यामध्ये अंघोळ, कपडे धुणे, भांडी धुणे व इतर कामांमध्ये बचत करणे शक्य होईल.

दुसरी महत्वाची बाब म्हणजे बाथरुमध्ये असणारे फ्लॅश टॅंक हे साधारणपणे आठ लिटरचे असतात ते फ्लॅश केल्यानंतर त्यातून आठ लिटर पाणी बाहेर पडते मात्र यामध्ये एक लिटरच्या दोन पाण्याच्या बाटल्या भरुन ठेवल्यास टॅंक फ्लॅश केल्यानंतर त्यातून सहा लिटर इतकेच पाणी बाहेर पडले त्यामुळे दोन लिटर पाण्याची बचत होईल अशाप्रकारे एका कुटुंबात सहा व्यक्ती असतील तर ते दिवसातून दोन वेळा बाथरुमला जाण्याचे प्रमाण धरले तर २४ लिटर पाण्याची बचत होऊ शकते यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या कुटुंबापासून सुरुवात करणे गरजेचे आहे. हा उपक्रम राबविण्याची गरज आहे. एकंदरीतच दुष्काळाच्या संकटावर सर्वांनी मिळून एकत्रितपणे मात करणे गरजेचे आहे.

**। सतीश गुप्ता, उद्योगपती**

**टीप :** शहरावर पाणी कपातीचे संकट उभे ठाकले आहे. यासाठी शहरवासीयांनी पाणी बचतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे. तरी आपण कशा पध्दतीने पाणी बचत कराल याची माहिती फोटोसह पुण्यनगरीला पाठवावी.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे - ५.
Email : ambika.pune@gmail.com

## तोलणार पतसंस्थेची दोन कष्टकऱ्यांना मदत

**। पुणे : प्रतिनिधी-**

मार्केटयार्डातील दुर्लक्षित असलेल्या तोलणार या घटकांच्या पतसंस्थेने प्रत्येक सदस्यांना विमा, अपघात विमा आणि अकाली निधन झाल्यास वारसांना आर्थिक मदत अशी तिहेरी सामाजिक सुरक्षा दिली आहे. आत्तापर्यंत वीस कष्टकरी कामगारांच्या कुटुंबियांना हा मदतीचा हात मिळाला आहे.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड तोलणार पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थेतर्फे दहा वर्षांपूर्वी प्रत्येक सदस्यांचा विमा आणि अपघात विमाही उतरविण्यात आला. या पतसंस्थेची १८ वी सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. या सभेत हमाल पंचायतीचे निमंत्रक नितीन पवार यांच्या हस्ते दिवंगत तोलणार शीतलकुमार पाटील यांच्या कुटुंबियांना आणि हनुमंत बहिरट यांच्या हस्ते दिवंगत राजेंद्र कुंजीर यांच्या कुटुंबियांना मदतीचा धनादेश देण्यात आला.

यावेळी हमाल पंचायतीचे पदाधिकारी, तोलणार संघटनेचे राजेंद्र चोरघे, संचालक प्रमोद भांडवलकर, तानाजी पवार, ज्ञानेश्वर जाधव, रमेश कोळेकर, अशोक होरड्डी उपस्थित होते. संस्थेला होणाऱ्या नफ्यातील काही भाग राखीव ठेवून तो कल्याण निधीकडे वळविला. यातून मदत दिली जाते. पतसंस्थेचे ३३८ सभासद असून, वार्षिक उलाढाल चार कोटी रुपयांपर्यंत गेली. सभासदांचे सव्वा कोटी रुपये इतके भाग भांडवल आहे.